**क्र.का.५/मु./प्र.क्र.११३७/परिपत्रक/९१/६३९-८८**
**नोंदणी महानिरीक्षक व मुद्रांक नियंत्रक**
**महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालय,पुणे १.**
**दिनांक : २१/३/१९९१**

**प रि प त्र क :-**

**विषय :- मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८**
**परताव्या बाबतच्या तरतुदींचे**
**काटेकोरपणे पालन करण्याबाबत.**

**संदर्भ :- शासनाचे महसूल व वन विभागाचे परिपत्रक क्र.**
**मु. १०९१/१५९९/प्र.क्र.६४१/ म-१, दि. २०.२.१९९१.**

वरील विषयाबाबत शासनाच्या असे निदर्शनास आले आहे की, मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ च्या कलम ५२ मधील तरतुदीनुसार निरूपयोगी ठरलेले मुद्रांक कागद/विशेष चिकट मुद्रांक यांचा परतावा मंजूर करताना जी वजातीची रक्कम काढण्यात येते ती बऱ्याच वेळा चुकीच्या पद्धतीने परिगणना (Calculate) केली जाते. परिणामी वजावटीची कमी रक्कम वसूल केली जाते.

२) मुद्रांक कायद्यातील तरतुदीनुसार मुद्राकांच्या किंमतीतून शेकडा २/- किंवा प्रत्येक मुद्रांक कागदास/चिकट मुद्राकांस रु. १०/- यापैकी जी रक्कम जास्तीत जास्त असेल ती वजा करून अनुमत रकमेचा परतावा मंजूर करावयाचा असतो. असे करताना प्रथम प्रत्येक मुद्रांकाचे नग व किंमत लक्षात घेऊन अशी जास्तीत जास्त वजातीची रक्कम काढली गेली पाहिजे. **निव्वळ मुद्रांकाची एकूण संख्या/एकूण किंमत** लक्षात घेऊ नये. कारण अशा प्रकरणी संबंधितांस जादा रकमेचा परतावा मंजूर होण्याची शकयता आहे व त्या रकमेच्या वसूलीची कार्यवाही लेखापरीक्षा आक्षेपानंतर करावी लागेल. त्यामुळे प्रशासकीय कामकाजावर अकारण ताण पडण्याची शक्यता निर्माण होते. यास्तव असे चुकीचे परिगणन (Calculation) टाळण्यासाठी मुंबई मुद्रांक अधिनियम १९५८ मधील अनुमत परताव्याबाबतच्या तरतुदींचे काटेकोरपणे पालन करण्यात यावे.

तसेच या कार्यालयाकडे परतावा प्रकरणे पाठविताना आपल्या प्रस्तावामध्ये वरील बाबींचा स्पष्ट उल्लेख असावा.

**सही/-**
**(म.भा.मेंगाळ)**
**सहाय्यक नोंदणी महानिरीक्षक व**
**कार्यासन अधिकारी क्र. ५, म.रा.पुणे.**

**प्रत माहितीसाठी व कार्यवाहीसाठी :-**

**१) सर्व नोंदणी उपमहानिरीक्षक व मुद्रांक उपनियंत्रक**
**२) मुद्रांक अधिक्षक मुंबई**
**३) दुय्यम निबंधक मुंबई**
**४) सर्व सह जिल्हा निबंधक व मुद्रांक जिल्हाधिकारी**
**५) सर्व कार्यासन अधिकारी, नोंदणी महानिरिक्षक कार्यालय, पुणे.**